श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर.

## हार व फुलांचे दरपत्रक

प्रति,

मा. कार्यकारी अधिकारी,

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर.

विषय :- हार व फुलांचे दरपत्रक.

पुरवठा धारकाचे पूर्ण नाव :- श्री.--------------------------

पूर्ण पत्ता :- --------------------------

--------------------------

मोबाईल क्र. :- --------------------------

महोदय,

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीचे नित्योपचार विभागासाठी **०१ वर्षासाठी** (दि. ०१/०२/२०२२ ते ३१/०१/२०२३) हार व फुलांचा व इतर मालाचा पुरवठा करणेकामी खालीलप्रमाणे दरपत्रक सादर करीत आहे.

| अ.क्र. | तपशील | दर्जा | परिमाण | दर प्रती नग रक्कम | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अंकी (रू.) | अक्षरी (रू.) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | उपचाराचे मोठे डबल हार | उत्तम | प्रती नग | | |
| २ | छोटे सिंगल हार | उत्तम | प्रती नग | | |
| ३ | मोठे मध्यम हार | उत्तम | प्रती नग | | |
| ४ | सिंगल तुळशी हार | उत्तम | प्रती नग | | |
| ५ | डबल सत्कार हार | उत्तम | प्रती नग | | |
| ६ | सुट्टी तुळशी व फुले | उत्तम | प्रती किलो | | |
| ७ | तुरा | उत्तम | प्रती नग | | |
| ८ | मोठा कंठा तुळशीचा | उत्तम | प्रती नग | | |
| ९ | तुळशी मध्यम मोठी माळ | उत्तम | प्रती नग | | |
| १० | केळीचे खुंट | उत्तम | प्रती नग | | |
| ११ | पंचपल्लव | उत्तम | प्रती नग | | |
| १२ | राघू | उत्तम | प्रती नग | | |
| १३ | दुर्वाची मोठी जोडी | उत्तम | प्रती नग | | |
| १४ | मोगऱ्याचा हार | उत्तम | प्रती नग | | |
| १५ | गजरा | उत्तम | प्रती नग | | |
| १६ | केवडा | उत्तम | प्रती नग | | |

कृपया मागे पहा...

वरील दर श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर येथे पोहोच खर्च आणि सर्व प्रकारचे करासहीत आकारण्यात आले आहेत. सदर दराने उक्त कालावधीत उत्तम गुणवत्तेचे हार व फुलांचा पुरवठा करणेस मी बांधील राहील. त्याबाबतचे अटी व शर्ती मान्य असलेचे करारपत्र १०० रू. स्टॅम्प पेपरवर करून देण्यास व रू.५,०००/— अनामत रक्कम भरण्यास मी तयार आहे. तरी वर नमुद दरपत्रकाप्रमाणे हार व फुलांचा पुरवठा करणेचे काम मला मिळण्यास विनंती आहे.

दिनांक /——/२०२

पुरवठाधारकाची सही व शिक्का

**सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत.**

१. यापूर्वी कोणत्या संस्थेला हार व फुलांचा पुरवठा केला असल्यास, त्याची अनुभवाची प्रमाणपत्रे सोबत जोडावीत.

२. स्वतःच्या ओळखपत्राची (आधारकार्ड आवश्यक) व रहिवासाच्या पुराव्याची झेरॉक्स प्रत.

३. पॅनकार्ड.

४. शॉप ॲक्ट लायसन्स वा तत्सम परवाना.

## श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

## हार व फुले पुरवठाकामाची माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे.

१. सदर कामासंबंधीचा फॉर्म स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. सदरच्या मालाचा पुरवठा **०१ वर्षासाठी** (दि. ०१/०२/२०२२ ते ३१/०१/२०२३) या कालावमधीमध्ये करावयाचा आहे. लिफाप्यावर पुरवठाधारकाचे पूर्ण नाव व पूर्ण पत्ता नमूद करणे आवश्यक आहे. तसेच लिफाप्यावर हार व फुले पुरवठा करणेकामी दरपत्रक असे नमूद करणे आवश्यक आहे. सदरचे दरपत्रक समक्ष श्री संत तुकाराम भवन येथे सादर करावे किंवा रजिस्टर पोस्टाने दि. ०८/०२/२०२२ रोजी सायंकाळी ०५.०० पर्यत पाठवावेत. उशीरा आलेले दरपत्रके विचारात घेतल्या जाणार नाहीत.

२. अनामत रक्कम रू.५,०००/—डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. डी.डी. **'कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर'** यांचे नावे काढावा.

३. पुरवठा धारकाने फॉर्ममध्ये नमूद केलेल्या दराने **एक वर्ष** कालावधीत हार व फुले पुरवठा या कार्यालयाच्या मागणी प्रमाणे करणे आवश्यक आहे.

४. पुरवठा करावयाच्या मालाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मालाचा तपशील | परिमाण | मंजुर दर रू. |
|---|---|---|---|
| १ | उपचाराचे मोठे डबल हार | प्रती नग | |
| २ | छोटे सिंगल हार | प्रती नग | |
| ३ | मोठे मध्यम हार | प्रती नग | |
| ४ | सिंगल तुळशी हार | प्रती नग | |
| ५ | डबल सत्कार हार | प्रती नग | |
| ६ | सुट्टी तुळशी व फुले | प्रती किलो | |
| ७ | तुरा | प्रती नग | |
| ८ | मोठा कंठा तुळशीचा | प्रती नग | |
| ९ | तुळशी मध्यम मोठी माळ | प्रती नग | |
| १० | केळीचे खुंट | प्रती नग | |
| ११ | पंचपल्लव | प्रती नग | |
| १२ | राघू | प्रती नग | |
| १३ | दुर्वाची मोठी जोडी | प्रती नग | |
| १४ | मोगऱ्याचा हार | प्रती नग | |
| १५ | गजरा | प्रती नग | |
| १६ | केवडा | प्रती नग | |

५. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या नमून्यांतच मालाचा पुरवठा करणेचा आहे.

६. सर्व हार व फुले स्वच्छ व ताजी असणे आवश्यक आहे.

७. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किमतीच्या ५ टक्केपर्यंत दंड आकारण्यात येईल.

८. माल खराब असल्याचे आढळून आलेस पुरवठाधारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

कार्यकारी अधिकारी

९. श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती आवश्यकतेनुसार एक किंवा एकापेक्षा जास्त ठेकेदाराला कार्यादेश देऊ शकते.

१०. हार व इतर माल तयार करण्याची जागा ही स्वच्छ असावी.

११. कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर आवश्यक ती खबरदारी घ्यावी.

१२. कमी प्रतीच्या हार व फुलांचा पुरवठा झाल्याचे आढळून आल्यास त्याचे देयक अदा करण्यात येणार नाही.

१३.पुरवठादाराने मंदिर समितीला पुरवठा केलेल्या हार व फुलामध्ये किडे, माशी, केस व इतर अस्वच्छ बाबी आढळून आल्यास सर्वस्वी जबाबदारी पुरवठाधारकाचे राहील व मंदिर प्रशासन ठरवतील त्याप्रमाणे पुरवठादारावर कारवाई करण्यात येईल.

१४.कमी जास्त दराची कोणतेही दरपत्रक स्वीकारण्याचा, नाकारण्याचा अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे, स्पष्टीकरण देणे समितीवर बंधनकारक राहणार नाही.

१५.दरपत्रक मंजूर करताना मालाची गुणवत्ता तपासणी जाईल. कमी गुणवत्ता असलेल्या मालाचे दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

१६.दरपत्रके उघडण्याची तारीख पुरवठाधारकास दुरध्वनीद्वारे कळविण्यात येईल. त्यादिवशी मालाचे नमुने घेवून येणे आवश्यक आहे.

१७.पुरवठा करण्यात आलेल्या मालाची प्रत व प्रमाण संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

१८.मालाचा पुरवठा करणेचे ठिकाण नित्योपचार विभाग, श्री.वि.रू.मं.स., पंढरपूर आहे.

१९.दरपत्रकात नमूद साहित्याचा दर सर्व करासहीत नमूद करावा. साहित्य पोहचविण्याचा वाहतुक खर्च, हमाली, बॉक्स खर्च अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठा धारकास दिला जाणार नाही.

२०.दरपत्रकात नमूद सर्व साहित्य यांचा दर नमूद करणे आवश्यक आहे. अपूर्ण दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२१.सदर कामाचे मंजूर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २ टक्के आयकर कपात केली जाईल.

२२.सदर कामासाठी ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

२३.माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस पुरवठाधारक जबाबदार राहील.

२४.समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

२५.दरपत्रक ज्यांचे नांवे मंजूर झालेली आहे, त्यांनी रक्कम रूपये १००/— चे स्टॅम्पपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

२६.सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

२७.वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर पुरवठा आदेश कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

२८.प्रशासकीय व अन्य कारणास्तव पुरवठा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

————————//————————